संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# भाजपा शिस्तीचे कुंभमेळयात विसर्जन

**लोकसभा** निवडणुकीच्या तोंडावर केंद्र आणि राज्य सरकारकडून नव्या योजनांचा घोषणांचा आणि जाहीरातींचाही पाऊस पाडला आहे. गेल्या चार वर्षात ज्या गोष्टी शक्य झाल्या नाहीत. त्याही या आठ दिवसांत शक्य करून दाखवण्याचा विक्रम ही दोन्ही सरकारे करताना दिसतात. केंद्र सरकारने तर नामुमकिन अब मुमकिन है किंवा अशक्य आता आहे शक्य या नावाने जोरदार प्रचार चालवला आहे. तर दुसरीकडे उत्तरप्रदेशमधल्या कुंभमेळ्याचा समावेश होत असताना लखनौला भाजपा नेत्यांमधल्या दंभ मेळ्याचे सगळ्या देशाला प्रदर्शन घडले. जिल्हा नियोजन बैठकीमध्ये भाजपाच्या खासदाराने आमदाराला चक्क चपलेने बडवून काढण्याचा आणि मग आमदारानेही खासदाराला ठोकून काढण्याचा धमासान प्रकार घडून आला. कुठल्या तरी एका प्रकल्पाच्या कोनशिलेवर आपले नाव का नव्हते, अशी विचारणा खासदाराने आमदाराकडे केल्याबरोबर आपणच तशा सूचना दिल्या होत्या असे उत्तर त्या आमदाराने दिले आणि या भाजपा खासदाराची तळपायाची आग मस्तकाला गेलेली दिसते. चक्क शे दीडशे लोकांच्या समोर टीव्ही कॅमेरे लावले असतानाही या खासदाराने दबंगगिरी करून नामुमकिन अब मुमकिन है असेच सिध्द करून दाखवले. काँग्रेसमुक्त भारत अशी घोषणा करून स्वतःचे वेगळेपण दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु काँग्रेसमुक्त भारतच्याऐवजी काँग्रेसयुक्त भाजपा असेच त्याचे आता स्वरुप झालेले आहे. राजकारण मग ते कोणत्याही पक्षाचे असो. ते खालच्या स्तरालाच गेल्याशिवाय राहात नाही हे यानिमित्ताने पुन्हा स्पष्ट झाले. आता या दोन्ही आमदार खासदारांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. म्हणजेच त्यांच्या या चुका माफ करण्यासाठी वेगवेगळी कारणे पुढे केली जातील. कुंभमेळा यशस्वी केल्याबद्दल योगी आदित्यनाथ पाठ थोपटून घेत असतानाच त्यांच्याच राज्यात, त्यांच्याच पक्षात किंबहुना त्यांच्याच अनुयायांनी हाणामारीचा आणि स्वतःमधल्या द्वेष मत्सराचा दंभमेळा भरवून पक्षाला आणि योगी आदित्यनाथांना एक मोठी भेटच दिलेली आहे.

## पक्षाची प्रतिष्ठा लिलावात

आतापर्यंत अनेक राजकीय पक्षांमध्ये हाणामाऱ्या होत आल्या. बैठकांमध्ये एकमेकांच्या अंगावर खुर्च्या टेबल फेकण्यापासून ते भर विधीमंडळ सभागृहांमध्ये एकमेकांच्या अंगावर धावून जाण्यापर्यंतचे अनेक प्रकार घडले आहेत. परंतु आपल्याच पक्षाच्या आमदाराला थेट चपलेने किंवा बुटाने सर्वासमक्ष बदडण्याचा हा बहुदा पहिलाच प्रकार असावा. या पध्दतीने निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी भाजपाचे नेते वागत असतील तर पक्षाची उरली सुरली प्रतिष्ठाही त्यांनी आता लिलावात काढली आहे असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. सध्याचे वातावरण काय आहे. पुलवामा हल्ल्याच्याविरोधात प्रतिहल्ला करून सैनिकांविषयी आदर व्यक्त होत आहे. लोकांमध्ये सध्या एक वेगळीच भावना पसरलेली आहे. जे सैनिक कोणत्याही श्रेयाशिवाय, कोणत्याही नावाशिवाय देशासाठी आपले प्राण पणाला लावतात. अशा अनाम वीरांना देश अभिवादन करीत असताना भाजपामधले हे तथाकथित राष्ट्रभक्त एका कोनशिलेवर आपले नाव नाही म्हणून एकमेकांच्या अंगावर धावून जावेत किंवा चपलेने एकमेकांना मारहाण करून त्यांनी पक्षाच्या प्रतिष्ठेची लक्तरेच वेशीवर टांगण्याचे श्रेय घेतले आहे असे म्हणता येईल. अनेकवेळेला पक्षशिस्तीपासून ते देशभक्तीपर्यंत भाजपा कसा आगळावेगळा आहे हे सांगण्याची चढाओढ या पक्षाच्या नेत्यांमध्ये सुरु असते. परंतु हा सगळा वरवरचा देखावा म्हणावा लागतो. दुरून डोंगर साजरे या म्हणीप्रमाणे एकमेकांविरुध्दचा द्वेष आणि मत्सर या पक्षातही दुथडी भरून वाहात असतो. केवळ स्वार्थासाठीच या अंतर्गत कलहाचे प्रदर्शन टाळण्याचा प्रयत्न होतो. पण प्रत्यक्षात या पक्षाच्या राष्ट्रीय स्तरापासून ते गल्लीस्तरापर्यंत प्रचंड धुसपूस चालू असते. दुर्दैव असे की राजकारणाच्या नावाखाली या गोष्टी दडपून नेल्या जातात किंवा राजकारणात हे असे चालायचेच. असे म्हणण्यापर्यंत त्या त्या पक्षाच्या वरिष्ठांची मजल जात असते. परंतु अशा प्रवृत्तीचे लोक जर निवडून येत असतील आणि त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून सन्मान दिला जात असेल तर लोकशाहीचा हा किती घोर अपमान आहे हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. ज्या मतदार संघांमधून हे दोन आमदार खासदार निवडून आले असतील त्या मतदारांनादेखील ओशाळलेपणाचा किंवा अपमानित होण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला असेल यात काही शंका नाही.

## बेडर नेते आणि कार्यकर्ते

केवळ उत्तरप्रदेशच नव्हे तर प्रत्येक राज्यामध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये अशा प्रकारची अंतर्गत धुसपूस वाढलेली आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांपूर्वी मध्यप्रदेश, छत्तीसगढ, राजस्थान या तीनही ठिकाणी एकमेकांविरुध्दची कुरघोडी स्थानिक लोकांना पाहायला मिळाली. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतल्या एका इंग्रजी साप्ताहिकाच्या कार्यक्रमात बोलताना असे म्हटले होते की, गैरकारभार दूर करण्यासाठी कडक कारवाई करीत असेल तर अशा प्रकारची भीती आवश्यक आहे. त्यासाठी मोदींनी डर हा शब्द वापरला होता. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर धाडी टाकल्या जात असतील तर अशा प्रकारचा डरही आवश्यक ठरतो. काही वेगवेगळी उदाहरणे देऊन सरकारने निर्माण केलेल्या भीतीचे किंवा डरचे कौतुक केले होते. पण प्रत्यक्ष त्यांच्याच पक्षामध्ये सगळा डर धाब्यावर बसवून हाणामारी करणारे आमदार खासदार असतील तर ते किती बेडर आहेत हे लक्षात येते. स्वतःच्या पक्षामध्ये कार्यकर्त्यांमध्ये किंवा नेत्यांमध्ये शिस्तीची भीती नसेल तर मोदींनी म्हटलेला बाकीचा डरही निरर्थक वाटू लागतो. काही दिवसांपूर्वीच भाजपातर्फे मेरा घर भाजपा परिवार अशा प्रकारची मोहीम राबवली गेली. आणि आपले घर हेसुध्दा कसे पक्षाशी एका कुटुंबासारखे निगडीत आहे हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. परंतु भाजपा परिवारातली ही बेबंदशाही लोकशाहीचाच उध्दार करणारी म्हणावी लागते.